## जिल्ह्यात १४ फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**जळगाव :** जिल्ह्यातील आगामी राजकीय हालचाली व कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका प्रलंबित आहे. तरी त्या अनुषंगाने जळगाव जिल्हयात ग्रामीण स्तरावर राजकीय हालचालीना वेग आला असून पक्षांतर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. याअनुषंगाने सार्वजनिक शांतता अबाधित राखण्यासाठी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशान्वये या कालावधीत शस्त्र, दाहक व स्फोटक पदार्थ बाळगणे, दगडफेक, प्रतिकात्मक दहन, अश्लील वा शांतता भंग करणारी भाषणे-हावभाव तसेच दहन तसेच पोलिस अधिक्षक, जळगाव यांच्या पुर्व परवानगी शिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश शासकीय कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न व धार्मिक मिरवणुकांना तसेच कर्तव्यावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही.

### महत्वाचे

#### ग्रामीण भागात विजेचा लपंडाव

**चोपडा :** ग्रामीण भागात सध्या विजेचा लपंडाव वाढला असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या रब्बी पिकांना पाणी देणे सुरु असून त्यात विज नसल्याने शेतकऱ्यांना मनस्ताप होत आहे. ग्रामीण भागात सध्या वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार वाढले असून विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शेतकरी वर्गाला याचा मोठा फटका बसत आहे. सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याचे काम जोरात सुरू आहे. मात्र वेळेवर वीजपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देताना अडचणी येत आहेत. अनेक ठिकाणी रात्री-अपरात्री वीज येत असल्याने शेतकऱ्यांना जागरण करावे लागत आहे. तर कधी अचानक वीज गायब होत असल्याने मोटारी बंद पडून काम अर्धवट राहते. वीजपुरवठा अनियमित असल्यामुळे घरगुती वापरावरही परिणाम झाला असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होत आहेत. संबंधित वीज वितरण कंपनीने लवकरात लवकर विजेचा प्रश्न सोडवून सुरळीत व नियमित वीजपुरवठा करावा, अशी मागणी नागरिक व शेतकरी वर्गातून होत आहे.

#### भुसावळात घाणीचे साम्राज्य वाढले

**भुसावळ :** शहरात घाणीचे साम्राज्य वाढले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा ठाकला आहे. नगरपालिकेने स्वच्छता करावी अशी मागणी होत आहे. शहरात सध्या घाणीचे साम्राज्य पसरले असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील अनेक भागांमध्ये कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येत असून नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. वसाहती, बाजारपेठ परिसर तसेच मुख्य रस्त्यालगत कचरा वेळेवर उचलला जात नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसाळ्याचे दिवस जवळ येत असताना परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून नियमित साफसफाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही केवळ आश्वासने दिली जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी नगरपालिकेची असून तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. नगरपालिकेने त्वरित स्वच्छता मोहीम राबवून कचरा उचल, नाल्यांची साफसफाई व फवारणी करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# जिल्ह्यात आत्महत्त्येच्या घटनांमध्ये वाढ

## तरुण, तरुणी उचलताय् टोकोचे पाऊल : आत्महत्या रोखण्यासाठी सामाजिक संस्थांचा पुढाकार आवश्यक

**राजेश यावलकर**
**जळगाव** लोकशाही न्यूज नेटवर्क

जिल्ह्यात सध्या आत्महत्येच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र समोर येत असून, या वाढत्या प्रवृत्तीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे या घटनांमध्ये केवळ शेतकरी किंवा आर्थिक अडचणीत असलेलेच नव्हे, तर तरुण, तरुणी तसेच महिलांची संख्याही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. ही बाब समाजासाठी गंभीर इशारा मानली जात असून, आत्महत्येचे वाढते प्रमाण ही केवळ वैयक्तिक समस्या नसून सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आरोग्याशी निगडित व्यापक समस्या असल्याचे स्पष्ट होत आहे.

गेल्या काही महिन्यांत जिल्ह्यात विविध भागांतून आत्महत्येच्या घटनांच्या बातम्या सातत्याने समोर येत आहेत. काही ठिकाणी शिक्षण अपूर्ण राहिल्याने नैराश्य, काही ठिकाणी बेरोजगारीमुळे निर्माण झालेले असमाधान, तर काही ठिकाणी कौटुंबिक वाद, आर्थिक तणाव, व्यसनाधीनता आणि



प्रेमसंबंधांतील ताणतणाव या कारणांमुळे टोकाचे पाऊल उचलण्यात आले आहे. विशेषतः तरुण वर्गामध्ये भविष्याबाबतची अनिश्चितता, अपेक्षांचे ओझे आणि अपयशाची भीती यामुळे मानसिक दबाव वाढत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या स्पर्धात्मक जीवनशैलीत अनेकजण अपयश स्वीकारण्यास तयार नसतात. शैक्षणिक निकाल, नोकरी न मिळणे, व्यवसायात तोटा, कर्जाचा बोजा किंवा कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे मानसिक कोंडी होते. या मानसिक अवस्थेत योग्य वेळी समुपदेशन, आधार आणि संवाद मिळाला नाही, तर व्यक्ती नैराश्याच्या गर्तेत अडकते आणि त्यातूनच टोकाचे निर्णय घेतले जातात.

महिलांमध्ये वाढत असलेल्या आत्महत्येच्या घटनाही तितक्याच चिंताजनक आहेत. कौटुंबिक कलह, वैवाहिक ताणतणाव, सासरच्या छळाचे प्रकार, आर्थिक अवलंबित्व तसेच सामाजिक बंधने यामुळे अनेक महिला मानसिकदृष्ट्या खचत असल्याचे चित्र आहे. काही प्रकरणांत महिलांनी आपली वेदना कुणाशीही न मांडता मनातच साठवून ठेवल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनते. व्यसनाधीनतेचा प्रश्नही आत्महत्यांच्या वाढत्या घटनांमागे महत्त्वाचा घटक ठरत आहे. दारू, तंबाखू तसेच इतर व्यसनांमुळे आर्थिक व कौटुंबिक समस्या वाढतात. व्यसनामुळे निर्णयक्षमता कमी होते आणि भावनिक अस्थिरता वाढते. परिणामी क्षणिक आवेशात घेतलेले निर्णय आयुष्यभराचा पश्चात्ताप ठरतात. या सर्व परिस्थितीचा विचार करता, आत्महत्येच्या वाढत्या घटनांना केवळ वैयक्तिक अपयश म्हणून न पाहता, ही एक सामाजिक समस्या म्हणून हाताळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त आहे. शासनस्तरावरून मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार करणे, ग्रामीण व शहरी भागांत समुपदेशन केंद्रांची संख्या वाढवणे, शाळामहाविद्यालयांत मानसिक आरोग्याबाबत जागृती कार्यक्रम राबवणे ही काळाची गरज बनली आहे. कुटुंब आणि समाजाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. घरातील सदस्यांशी संवाद ठेवणे, त्यांच्या भावनिक गरजा समजून घेणे आणि अडचणीच्या काळात आधार देणे आवश्यक आहे. 'समस्या कोणतीही असो, तिच्यावर तोडगा नक्कीच असतो' हा विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. अनेक वेळा एखाद्या व्यक्तीला केवळ ऐकून घेणारा कोणी तरी हवा असतो. तो आधार वेळेत मिळाल्यास मोठा अनर्थ टाळता येऊ शकतो.

### संस्थांनी पुढाकार घ्यावा!

सामाजिक संस्थांनीही या दिशेने पुढाकार घेण्याची गरज आहे. जनजागृती मोहीम, व्यसनमुक्ती कार्यक्रम, रोजगार मार्गदर्शन शिबिरे, युवकांसाठी कौशल्य विकास उपक्रम यामुळे तरुणांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो. जिल्ह्यात वाढत असलेल्या आत्महत्यांच्या घटनांमुळे एक बाब स्पष्ट होत आहे की, मानसिक आरोग्याकडे अजूनही अपेक्षित तेवढे लक्ष दिले जात नाही. शारीरिक आजारांप्रमाणेच मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे, ही जाणीव समाजात रुजवण्याची गरज आहे. वेळेवर मदत, योग्य समुपदेशन आणि आपुलकीचा संवाद यामुळे अनेकांचे आयुष्य वाचू शकते.

### 'किरण' करणार मदत

कुणीही मानसिक तणाव, नैराश्य किंवा आत्महानीचे विचार अनुभवत असतील, तर त्यांनी एकटे न राहता तात्काळ मदत घ्यावी, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. शासनाच्या 'किरण' मानसिक आरोग्य हेल्पलाईनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदत सेवा उपलब्ध असून, अशा सेवांचा लाभ घेणे ही कमजोरी नसून धैर्याचे लक्षण आहे. समाजाने एकत्र येऊन संवेदनशीलतेने या प्रश्नाकडे पाहिल्यास आणि प्रत्येक व्यक्तीला आधार देण्याची भूमिका घेतल्यास, आत्महत्यांच्या वाढत्या घटनांना निश्चितच आळा घालता येईल.

## सॉफ्टबॉल स्पर्धेत व्ही. पी. होले कॉलेज प्रथम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेत के. सी. ई. सोसायटी संचलित व्ही. पी. होले कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड फिजिकल एज्युकेशन येथील मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या



स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर महाविद्यालयातील धीरज बाविस्कर, प्रतिक देशमुख, मयुरेश ओसरकर, शुभम गवळी या चार विद्यार्थ्यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल संघात निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंनी अमरावती विद्यापीठात होत असलेल्या आंतर विद्यापीठीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सहभाग घेतला. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. अशोक राणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य केतन चौधरी, विभाग प्रमुख प्रा. प्रणव बेलोरकर, प्रा. प्रविण कोल्हे, प्रा. आकाश बिवाल, प्रा. सय्यद इरतकाझ, प्रा. आकाश धनगर उपस्थित होते.

## मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील मू. जे. महाविद्यालय येथे दि. ९ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित केलेल्या मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन इतिहास विभाग व हेरिटेज संवर्धन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय व्यवहारात व लोक व्यवहारात रूढ असलेली मोडी लिपी अलीकडे कालबाह्य होऊ पाहत आहे. मोडी लिपीतील अभिलेखागारातून संरक्षित असलेली ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाच्या शास्त्रशुद्ध मांडणीकरिता अप्रकाशित त्रुटीरहित वाचन होणे आवश्यक आहे. तसेच खाजगी मोडी कागदपत्रांमधील मजकूर जाणून घेण्याबाबत सुद्धा अडचण निर्माण झाली आहे. त्यासाठी मोडी जाणकार तयार होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व शहरातील इच्छुक व्यक्तींकरिता नि:शुल्क मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येत आहे. ही कार्यशाळा सकाळी ११ ते १२.३० या वेळेत होणार आहे. इच्छुक व्यक्तींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे यांनी केले.

## अजितदादांच्या अस्तींचे जळगावकरांनी घेतले दर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात अजित पवार यांच्या अस्तींचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अंतिम दर्शन घेतले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी हळहळ व्यक्त केली. संजय पवार, जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे, माजी आमदार मनिष जैन यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी 'अमर रहे अमर रहे... अजितदादा अमर रहे' अशा घोषणा देण्यात आल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या अस्थींचे जळगाव शहरात दर्शन घेण्यात आले.



जळगाव : अजित पवार यांच्या अस्ती कलशाचे दर्शन घेतांना पदाधिकारी. (छाया : निखिल मोरे)

जळगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या भावनिक वातावरणात अंतिम दर्शन घेतले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत हळहळ व्यक्त केली. पक्षासाठी आणि समाजासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा यावेळी उपस्थितांनी उल्लेख केला. वातावरण शोकमय झाले होते. अजित पवार यांच्या निधनाने पक्षावर आणि जळगाव जिल्ह्यावर मोठी शोककळा पसरली असून त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## ऐनपूर आरोग्य केंद्र अस्वच्छतेच्या विळख्यात!

### त्वरीत समस्या सोडवासी : शुभम पाटील यांची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर, ता. रावेर** प्रतिनिधी

येथील प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात अस्वच्छता व दुर्गंधीचे गंभीर वातावरण निर्माण झाले असून याचा थेट परिणाम रुग्णांच्या आरोग्यावर होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना दुर्गंधीमुळे त्रास सहन करावा लागत असून आरोग्य केंद्राच्या स्वच्छतेबाबत प्रशासनाचे दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत आहे.

या प्रकाराकडे लक्ष वेधत भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष शुभम पाटील यांनी आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक आरोग्य केंद्रात अशी अवस्था असणे अत्यंत दुर्दैवी असून तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. ग्रामीण




भागातील नागरिकांचे आरोग्य हे शासनाचे प्राधान्य असले पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्रातच स्वच्छतेचा अभाव असेल तर रुग्णांनी उपचारासाठी कुठे जावे? असा सवाल शुभाम पाटील यांनी उपस्थित केला. संबंधित विभागाने त्वरित दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे. या घटनेमुळे ऐनपूर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून आरोग्य प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## पत्रकारांना मज्जाव करण्याचा हेतू काय?

नियोजन, पारदर्शकता आणि लोकशाही यांचा मेळ जिथे बसायला हवा, तिथेच जर पडदा टाकला जात असेल, तर संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. जळगाव जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी)च्या बैठकीत पत्रकारांना वार्तांकनापासून मज्जाव करण्याचा प्रकार हा केवळ प्रशासनिक निर्णय नसून, लोकशाही मूल्यांवर थेट घाला घालणारा प्रकार ठरतो. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाची असलेली डीपीडीसी बैठक जर गुप्ततेच्या अंधारात घडवली जात असेल, तर 'विकास' हा शब्द केवळ कागदावरच शोभून दिसतो, अशी स्थिती आहे.

डीपीडीसी म्हणजे जिल्ह्याचा विकास आराखडा ठरविण्याचे सर्वोच्च व्यासपीठ. येथेच रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, रोजगार, सिंचन अशा कोट्यवधी रुपयांच्या योजना ठरतात. अशा बैठकीत काय चर्चा होते, कोणते निर्णय घेतले जातात, कुणाचा विरोध असतो, कुणाचा पाठिंबा हे सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करतात. पत्रकार म्हणजे कुणी बाहेरचा घुसखोर नसून, लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. मग या स्तंभालाच आत येऊ न देण्यामागे नेमका हेतू काय? प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी याबाबत मौन बाळगले असले, तरी वास्तव लपून राहत नाही. सभागृहात होणारी हमरीतुमरी, आरोप-प्रत्यारोप, शब्दांची आणि कधी कृतीचीही मर्यादा ओलांडणारे प्रसंग बाहेर जाऊ नयेत, हाच मुख्य उद्देश असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याआधीच्या डीपीडीसी बैठकांमध्ये झालेली गदारोळ, एकमेकांवर धावून जाणारे पुढारी, कुस्तीच्या मैदानासारखे रूप धारण करणारे सभागृह हे सर्व जिल्हावासियांनी माध्यमांतून पाहिले आहे. त्यामुळे 'शिस्त' किंवा 'सुव्यवस्था' या कारणांखाली पत्रकारांना बाहेर ठेवण्याचा युक्तिवाद फोल ठरतो. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, लोकसभा आणि विधानसभेच्या अधिवेशन काळात पत्रकारांसाठी विशेष मान्यतापत्रे, लाईव्ह प्रसारणाची व्यवस्था असते. देशाच्या आणि राज्याच्या सर्वोच्च सभागृहात पत्रकारांना प्रवेश असतो, प्रश्न विचारण्याची, चर्चा मांडण्याची मुभा असते. मग जळगाव जिल्ह्याच्या डीपीडीसीची बैठक ही संसद आणि विधानसभेपेक्षा अधिक



'संवेदनशील' कशी काय ठरते? की येथे काही तरी असे घडते, जे लोकांच्या नजरेपासून दूर ठेवणे सत्ताधाऱ्यांना सोयीचे वाटते?

बैठकीनंतर मात्र लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी कोट्यवधी रुपयांचे आकडे मांडतात. इतक्या निधीला मंजुरी, अमुक योजनेस गती, विकासाला चालना अशा घोषणा केल्या जातात. पण हे सर्व ऐकताना एक साधा प्रश्न उभा राहतो जर इतकेच सर्व काही स्वच्छ, पारदर्शक आणि लोकहिताचे आहे, तर पत्रकारांना आत बसू देण्यास भीती का? आकडे सांगणे सोपे असते, पण त्या आकड्यांमागील चर्चा, वाद, दबाव, तडजोडी हेच खरे वास्तव असते. तेच वास्तव बाहेर जाऊ नये, यासाठीच हा मज्जाव असल्याची भावना बळावते. लोकशाही व्यवस्थेत सत्ता ही जनतेची असते. लोकप्रतिनिधी हे केवळ विश्वस्त असतात. त्यांनी काय निर्णय घेतले, कशाच्या आधारे घेतले, याची माहिती जनतेला मिळणे हा त्यांचा हक्क आहे. पत्रकार हा हक्क बजावण्याचे साधन आहे. पत्रकारांवर निर्बंध म्हणजे थेट जनतेच्या हक्कांवर निर्बंध. आज पत्रकारांना बाहेर ठेवले, उद्या प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांना बाहेर ठेवले, आणि परवा संपूर्ण निर्णयप्रक्रियाच बंद दाराआड नेली असा हा घसरता उतार लोकशाहीसाठी घातक आहे.

विशेष म्हणजे सध्या डीपीडीसी सभागृहात सत्तेच्या सारीपाटावरील सर्वच प्यादे एकाच बाजूचे असल्याचे चित्र आहे. तरीही जर पारदर्शकतेपासून पळ काढला जात असेल, तर संशय अधिकच गडद होतो. विरोधक नसताना, मोठा वाद नसताना, तरीही पत्रकारांना दूर ठेवण्याची गरज का भासावी? याचा अर्थ, प्रश्न केवळ राजकीय नाही, तर प्रशासकीय पातळीवरही काहीतरी दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. जळगाव जिल्हा हा विकासाच्या बाबतीत अनेक प्रश्नांनी त्रस्त आहे. सिंचन प्रकल्प रखडलेले, रस्त्यांची दुरवस्था, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी, शिक्षणातील असमानता या सर्व प्रश्नांची उत्तरे डीपीडीसीत शोधली जातात, असे सांगितले जाते. पण जर त्या शोधप्रक्रियेवरच पडदा टाकला जात असेल, तर उत्तरांवर कोण विश्वास ठेवणार? पारदर्शकता ही विकासाची पहिली अट आहे. तीच जर नाकारली, तर विकास केवळ घोषणांपुरताच मर्यादित राहतो.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी हे लक्षात घ्यायला हवे की, पत्रकार शत्रू नाहीत. ते आरसा आहेत. आरशात दिसणारे प्रतिबिंब आवडत नसेल, तर आरसा फोडून प्रश्न सुटत नाही.



**मन की बात**
**दीपक कुलकर्णी**
९९६०२१०३११

उलट, स्वतःकडे पाहून सुधारणा करावी लागते. डीपीडीसीच्या बैठकीत पत्रकारांना प्रवेश देणे, थेट वार्तांकन होऊ देणे, ही भीतीची नव्हे तर आत्मविश्वासाची खूण असायला हवी. जळगाव डीपीडीसीत पत्रकारांना रोखले गेले, उद्या हेच उदाहरण इतर जिल्हे घेतील. मग हळूहळू लोकशाहीच्या नावाखाली गुप्त कारभाराची नवी परंपरा तयार होईल. त्यामुळे हा प्रश्न केवळ पत्रकारांचा नाही, केवळ जळगावचा नाही, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेचा आहे. वेळीच जागे न झाल्यास, 'विकास' हा शब्द फक्त बॅनरवर, भाषणात आणि फाईलमध्येच उरेल. जनतेपर्यंत पोहोचणारा विकास आणि माहिती दोन्हीही बंद दाराआड अडकतील. म्हणूनच डीपीडीसीच्या बैठकीत पत्रकारांना मज्जाव करण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, आणि पारदर्शकतेचा मार्ग स्वीकारावा, हीच खरी विकासाची सुरुवात ठरेल.


हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर – No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १७ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.